# न्यूझीलंडने इतिहास घडवला!

## अमेलिया केरची नाबाद १७९ धावांची खेळी

**महाईन्यूज | न्यूझीलंड**

**न्यूझीलंड महिला संघ आणि दक्षिण आफ्रिका महिला संघ या दोन्ही संघांमध्ये ३ वनडे सामन्यांची मालिका सुरू आहे. या मालिकेतील पहिल्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने विजय मिळवला होता. तर दुसऱ्या सामन्यात न्यूझीलंडने सर्वात मोठ्या आव्हानाचा यशस्वी पाठलाग केला आहे. दक्षिण आफ्रिकेने या सामन्यातील पहिल्या डावात ३४६ धावा केल्या होत्या. न्यूझीलंडला हा सामना जिंकण्यासाठी सर्वात मोठ्या आव्हानाचा यशस्वी पाठलाग करायचा होता. या आव्हानाचा पाठलाग करताना अमेलिया केरने नाबाद १७९ धावांची खेळी करून न्यूझीलंडला २ गडी राखून विजय मिळवून दिला.**



महिला क्रिकेटमध्ये याआधी इतक्या मोठ्या आव्हानाचा यशस्वी पाठलाग केला गेला नव्हता. त्यामुळे न्यूझीलंडला हा सामना जिंकण्यासाठी इतिहास घडवायचा होता. जेव्हा संघ अडचणीत होता, त्यावेळी संघाची कर्णधार अमेलिया केर खंबीरपणे उभी राहिली. केरने १३९ चेंडूंचा सामना करत नाबाद १७९ धावांची खेळी केली. या खेळीदरम्यान तिने २३ चौकार आणि १ षटकार मारला. तिचं द्विशतक थोडक्यात राहून गेलं.

या सामन्यात न्यूझीलंड महिला संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या दक्षिण आफ्रिकेने दमदार सुरूवात केली. दक्षिण आफ्रिकेने ५० षटकांअखेर ६ गडी बाद ३४६ धावांचा डोंगर उभारला. दक्षिण आफ्रिकेकडून फलंदाजी करताना एनेके बॉशने ९० चेंडूत ९१ धावांची दमदार खेळी केली. तिचं शतक थोडक्यात हुकलं. तर लॉरा वॉल्डवॉर्टने ७४ चेंडूत ६९ धावांची खेळी केली. शेवटी फलंदाजी करताना क्लो ट्रायोनने वेगाने धावा करून २५ चेंडूत ५२ धावांची खेळी केली.




# कुपर कॉनोलीने जागेवरून खेचला १०३ मीटर लांब षटकार!

**महाईन्यूज | पंजाब**

**आयपीएल २०२६ स्पर्धेत मंगळवारी झालेल्या सामन्यात पंजाब किंग्ज आणि गुजरात टायटन्स हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते. या सामन्यातील शेवटच्या षटकात पंजाब किंग्ज संघाने विजय मिळवला आणि स्पर्धेतील पहिल्या विजयाची नोंद केली. या सामन्यात धावांचा पाठलाग करताना २२ वर्षीय कुपर कॉनोलीने तुफान फटकेबाजी केली. त्याने ४४ चेंडूंचा सामना करत ५ चौकार आणि ५ षटकारांच्या मदतीने ७२ धावांची खेळी केली. या खेळीच्या बळावर त्याने पंजाब किंग्ज संघाने ३ गडी राखून विजयाची नोंद केली. या खेळीदरम्यान त्याने १०३ मीटर लांब षटकार खेचला. ज्याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.**



या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करण्यासाठी आलेल्या गुजरात टायटन्स संघाने २० षटकांअखेर ६ गडी बाद १६२ धावा केल्या. पंजाब किंग्ज संघाला हा सामना जिंकण्यासाठी १६३ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या पंजाब किंग्ज संघाला हवी तशी सुरूवात करता आली नाही. सलामीला आलेला प्रियांश आर्य स्वस्तात माघारी परतला. त्यानंतर फलंदाजीला आलेल्या कुपर कॉनोलीने गुजरातच्या गोलंदाजांचा चांगलाच समाचार घेतला. यादरम्यान त्याने अनुभवी गोलंदाज राशिद खानच्या गोलंदाजीवर खणखणीत षटकार खेचला.

वेगवान गोलंदाजाच्या गोलंदाजीवर जागेहून लांब षटकार खेचणं इतकं जड जात नाही. कारण गोलंदाजीच्या गतीचा वापर करून सहज मोठा फटका मारता येतो. पण फिरकी गोलंदाजाविरूद्ध फलंदाजी करताना जागेहून मोठा फटका मारणं इतकं सोपं नसतं. पण कुपर कॉनोलीने राशिद खानच्या गोलंदाजीवर जागेवर उभं राहून १०३ मीटर लांब षटकार खेचला. तर झाले असे की, गुजरात टायटन्स संघाची गोलंदाजी सुरू असताना, ८ वे षटक टाकण्यासाठी राशिद खान गोलंदाजीला आला. या षटकातील दुसरा चेंडू कुपर कॉनोलीने लेग साईडच्या दिशेने पूर्ण ताकदीने मारला. हा १०३ मीटर लांब षटकार पाहून जगातील नंबर १ गोलंदाज म्हणून ओळखला जाणारा राशिद खानही आश्चर्यचकीत झाला.

या सामन्यात श्रेयस अय्यरने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या गुजरात टायटन्स संघाने २० षटकांअखेर ६ गडी बाद १६२ धावा केल्या. गुजरातकडून फलंदाजी करताना शुबमन गिलने ३९ धावांची खेळी केली. तर जोस बटलरने ३८ धावा केल्या. यासह ग्लेन फिलिप्सने २५ धावांचे योगदान दिले. पंजाब किंग्जला हा सामना जिंकण्यासाठी १६३ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या पंजाबकडून कुपर कॉनोलीने सर्वाधिक ७२ धावांची खेळी केली. तर प्रभसिमरन सिंगने ३७ धावा केल्या. कर्णधार श्रेयस अय्यरने १८ धावा केल्या. हा सामना पंजाबने ५ चेंडू शिल्लक ठेवून ३ गडी राखून आपल्या नावावर केला.